# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 03 October 2025
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- विजयादशमीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा, मराठवाड्यात पारंपरिक सीमोल्लंघन सोहळा
- नैतिक मूल्यांवर राजकारणात सहभाग, हे जनसेवेचं प्रभावी माध्यम–माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचं संघ शताब्दी सोहळ्यात प्रतिपादन
- अतिवृष्टीग्रस्तांना दिवाळीपूर्वी मदत–एकनाथ शिंदे यांचं आश्वासन, शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपयांच्या मदतीची उद्धव ठाकरे यांची मागणी
- हजारो बौद्ध अनुयायांच्या उपस्थितीत ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

आणि

- हवामान विभागाकडून आज छत्रपती संभाजीनगर आणि जालना वगळता उर्वरित मराठवाड्याला पावसाचा यलो अलर्ट

****

विजयादशमी अर्थात दसऱ्याचा सण काल पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा झाला. वाईटावर चांगल्याच्या विजयाचं प्रतीक असलेल्या या दिवशी सरस्वती पूजन, शस्त्र पूजन तसंच वाहन पूजनही केलं जातं, सायंकाळी सीमोल्लंघनानंतर घरोघरी आपट्याची पानं देण्यासाठी होणारे स्नेहमिलन कार्यक्रम, आणि रावणदहन ही या सणाची विशेष ओळख आहे. काल याच पद्धतीनं सर्वत्र विजयादशमी सोहळा साजरा झाला.

****

श्री क्षेत्र तुळजापूर इथं, काल सकाळी तुळजाभवानी देवीचा पारंपरिक सीमोल्लंघन सोहळा उत्साहात पार पडला. देवीची मूर्ती १०८ साड्यांमध्ये गुंडाळून

अहिल्यानगरच्या भिंगार इथून आलेल्या मानाच्या पलंग पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. सीमोल्लंघनानंतर देवीच्या मंचकी निद्रेला प्रारंभ झाला. आता अश्विनी पौर्णिमेला देवी पुन्हा सिंहासनारूढ होईल.

मराठवाड्यात माहूर, अंबाजोगाईसह राज्यात कोल्हापूरच्या अंबाबाईचा तसंच नाशिक जिल्ह्यात सप्तशृंगी देवीचा सीमोल्लंघन सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा झाला.

अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीची पालखी मिरवणूक काढण्यात आली. भाविक मोठ्या संख्येनं यावेळी उपस्थित होते.

सातारा इथं प्रथेप्रमाणे शाही सीमोल्लंघन सोहळा छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेरावे वंशज खासदार उदयनराजे भोसले यांच्या उपस्थितीत पार पडला. सातारा पोलिसांनी पालखी सोहळ्यास शस्त्र सलामी दिली.

हिंगोली इथल्या रामलीला मैदानात ऐतिहासिक दसरा मेळावा उत्साहात पार पडला. नागरिक मोठ्या संख्येनं यावेळी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर इथंही कर्णपुरा परिसरात तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. जालना शहरात नवरात्रात पूजन केलेल्या देवींच्या मूर्तींचं शहरातल्या मोती तलावातल्या कुंडात विसर्जन करण्यात आलं.

नांदेड इथल्या तख्त सचखंड श्री हुजुर साहिब गुरुद्वारा इथं दसरा महोत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा झाला. देश – विदेशातून आलेल्या शीख भाविकांच्या उपस्थितीत हल्ला – महल्ला मिरवणूक उत्साहात पार पडली.

****

राज्यात विविध पक्ष संघटनांचे दसरा मेळावे काल पार पडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्त नागपूर इथं झालेल्या कार्यक्रमाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नैतिक मूल्यांवर आधारित राजकारणात सहभाग, हे जनसेवेचं प्रभावी माध्यम असल्याचं प्रतिपादन कोविंद यांनी केलं. २०४७ पर्यंतच्या विकसित भारतात संघांचं महत्त्वपूर्ण योगदान असेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले..

**बाईट– माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद**

सरसंघचालक मोहन भागवत यांनी आपल्या संबोधनात सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, शिस्त आणि संविधानाचं पालन या पंचसूत्रीचा अधिकाधिक अवलंब करण्याचं आवाहन केलं. आत्मनिर्भर भारत निर्माण करताना

देशाच्या गरजेनुसार नव्हे तर इच्छेनुसार इतर राष्ट्रांवर अवलंबून रहावं, असं भागवत यांनी सांगितलं, ते म्हणाले…

**बाईट– सरसंघचालक मोहन भागवत**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी उपस्थित होते. बौद्ध आध्यात्मिक गुरु दलाई लामा यांचा शताब्दी सोहळ्याच्या शुभेच्छा संदेशही यावेळी वाचण्यात आला.

✲✲✲✲

मुंबईत गोरेगाव इथं झालेल्या मेळाव्यात शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना संबोधित केलं. अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतीचं आश्वासन त्यांनी दिलं,

**बाईट– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

✲✲✲✲

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर पार पडला. भारतीय जनता पक्ष आणि सरकारवर टीका करताना, उद्धव ठाकरे यांनी, शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपयांची मदतीची मागणी केली. शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही तर राज्यभर आंदोलनाचा इशारा दिला. ते म्हणाले…

**बाईट– उद्धव बाळासाहेब ठाकरे**

✲✲✲✲

बीड जिल्ह्यात सावरगाव इथं पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत दसरा मेळावा पार पडला. बीड जिल्ह्याचं हक्काचं पाणी आणून दुष्काळ मुक्तीचं आश्वासन, पंकजा मुंडे यांनी दिलं, तर बीड जिल्ह्यात निर्माण झालेला जातीपातीचा द्वेष संपला पाहिजे असं मत धनंजय मुंडे यांनी व्यक्त केलं.

✲✲✲✲

जिल्ह्यात नारायणगड इथं झालेल्या दसरा मेळाव्यात मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं. जे मिळालं ते भरपूर मिळालं, समाधानी रहा, उतावीळ वागू नका असा सल्ला देत, यापुढे ओबीसी समाजाला दोष देऊ नये, असंही जरांगे यांनी सांगितलं.

✲✲✲✲

राष्ट्रपिता महात्मा गांधी तसंच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त काल सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यासह सर्वत्र गांधीजी आणि शास्त्रीजींना आदरांजी अर्पण करण्यात आली.

****

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात काल १०३ नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांसमोर आत्मसमर्पण केलं. यात २३ महिलांचा समावेश आहे. यापैकी ४९ नक्षलवाद्यांवर मिळून एक कोटी सहा लाख रूपयांचं बक्षीस होतं.

****

६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन काल साजरा झाला. यानिमित्तानं देशविदेशातून बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येनं नागपूर इथं दीक्षाभूमीवर दाखल झाले होते. काल सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुराई ससाई यांनी अनुयायांना बुद्ध वंदना दिली. सायंकाळी झालेल्या मुख्य समारंभात या कार्यक्रमाला सारनाथ लर्निंग सेंटरचे भदंत चंदिमा थेरो, हरियाणा सरकारचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. राजशेखर वुंडरू यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल कामठी इथं ड्रॅगन पॅलेस टेम्पलला भेट देत भगवान गौतम बुद्धांना अभिवादन केलं. यावेळी झालेल्या बुद्ध वंदनेत ते सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या बुद्ध लेणी परिसरातल्या विपश्यना केंद्रान धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध कार्यक्रम पार पडले.

****

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ एस टी नं प्रवाशांच्या सोयीसाठी 'आपली एसटी' या नवीन ॲपचं लोकार्पण केलं आहे. या ॲपमुळे वाट पाहणाऱ्या प्रवाशांना एसटीचा अचुक ठावठिकाणा कळणार असून, प्रवास अधिक सुलभ, सोयीस्कर आणि पारदर्शक होणार असल्याचं, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे.

****

भारत–वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अहमदाबाद कसोटीत भारतानं काल आपल्या पहिल्या डावात दोन बाद १२१ धावा केल्या. त्यापूर्वी भारतानं वेस्ट इंडीजचा पहिला डाव १६२ धावात गुंडाळला. मोहम्मद सिराजनं ४, जसप्रीत

बुमराह ३, कुलदीप यादव २, तर वॉशिंग्टन सुंदरनं १ गडी बाद केला. भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल ३६ धावा करुन तर साई सुदर्शन ७ धावा करुन तंबूत परतला. कालचा खेळ थांबला तेव्हा के एल राहुल ५३ धावांवर, तर शुभमन गिल १८ धावांवर खेळत होता.

****

धनगर समाजाला एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी जालना इथं उपोषण करत असलेले दीपक बोऱ्हाडे यांनी काल समाजाच्या विनंतीनुसार उपोषण स्थगित केलं. बोऱ्हाडे यांना त्यांची कन्या अहिल्या हिच्या हस्ते नारळ-पाणी देण्यात आलं.

****

लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेल्या शेतीपिकांची काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पाहणी केली. सरकारने खंबीरपणे उभे राहून तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी त्यांनी यांनी केली.

****

हवामान

आज छत्रपती संभाजीनगर आणि जालना वगळता उर्वरित मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांसह जळगाव, अहिल्यानगर तसंच सोलापूर जिल्ह्यांनाही हवामान विभागानं आज यलो अलर्ट जारी केला आहे.

****